Adv. Dhananjay Bhonsale
President

Shailesh Tilak
General Secretary

**MAHARASHTRA JUDO ASSOCIATION**
**महाराष्ट्र ज्युदो संघटना**
Affiliated to Judo Fedration of India & Maharashtra Olympic Association
Trust Registration Number: F-3967 Mumbai

राज्य स्पर्धा परिपत्रक /सिनियर्स/पुणे-बालेवाडी /2021-22 09 फेब्रुवारी 2022

माननीय अध्यक्ष / सचिव
संलग्न आणि निमंत्रित जिल्हा ज्युदो संघटना

**विषय: 48 व्या पुरुष आणि महिला राज्य सिनियर्स ज्यूदो स्पर्धा आणि निवड चाचणी स्पर्धा, पुणे 2021-22**

महोदय / महोदया,

कळविण्यास आनंद होतो की, 48 व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट (सिनियर्स) पुरुष आणि महिला राज्य ज्यूदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा दिनांक 17, 18, आणि 19 फेब्रुवारी 2022 (गुरुवार ते शनिवार) दरम्यान बालेवाडी, पुणे येथे आयोजिली आहे. सदरील स्पर्धा महाराष्ट्र ज्यूदो संघटना आयोजित करत आहे.
स्पर्धेचा तपशील खालील प्रमाणे;
१) स्पर्धा कालावधी: दिनांक 17, 18 आणि 19 फेब्रुवारी 2022
२) स्पर्धेचे ठिकाण: बालेवाडी क्रीडा संकुल, पुणे
३) स्पर्धेचे वेळापत्रक:

| | |
|---|---|
| दिनांक<br>17 फेब्रुवारी 22 | **पुरुष खेळाडूंचे दुपारी 12.00 वाजेपर्यंत आगमन** आणि वजने<br>मॅनेजर्स मिटिंग / ड्रॉज : 02.00 वाजता; संध्याकाळी 04.00 वाजलेपासून स्पर्धांना प्रारंभ |
| दिनांक<br>18 फेब्रुवारी<br>2022 | उर्वरीत पुरुष स्पर्धा ;<br>**महिला खेळाडूंचे दुपारी 12.00 वाजेपर्यंत आगमन** आणि वजने;<br>मॅनेजर्स मिटिंग / ड्रॉज : 05.00 वाजता; संध्याकाळी 06.00 वाजलेपासून स्पर्धांना प्रारंभ |
| दि.19 फेब्रुवारी 22 | उर्वरीत महिला स्पर्धा; |

- सर्व जिल्ह्यांना विनंती आहे कि, कोविड -19 आणि ओमायक्रॉन संसर्गाच्या पार्श्वभूमीवर पुरुष आणि महिला खेळाडूंनी उपस्थिती वेगवेगळ्या दिवशी नोंदवायची आहे.
- सर्व स्पर्धकांनी स्पर्धेआधी 72 तास आरटीपीसीआर चाचणी करून घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. प्रत्येक खेळाडूने मास्क आणि सॅनिटायझर सोबत आणावा.
- कोणीही महिला खेळाडूने दि.17 फेब्रुवारी 2022 रोजी स्पर्धास्थळी येऊ नये.

अत्यंत कठीण काळात या स्पर्धा केवळ खेळाडूंच्या हिताच्या बांधिलकीमुळे वेळेत आयोजित केल्या जात असल्याने सर्व सचिवांना विनंती की त्यांनी त्यांच्या जिल्ह्यांचे संघ निर्देशित वेळेप्रमाणे पाठवावेत आणि या परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे खेळाडूंनी तंतोतंत वर्तन करण्याची सूचना द्यावी.
४) प्रवेश शुल्क: रू. 300/- प्रत्येकी
- कोविडच्या पार्श्वभूमीवर खेळाडूंना अधिक आर्थिक भार नको म्हणून निवास व्यवस्था तसेच भोजन व्यवस्था खर्चाचा भार महाराष्ट्र ज्यूदो संघटनेतर्फे उचलण्यात येईल.

5) हमी जमा -रु 1,000/- प्रति संघ (मुलांचे वेगळे आणि मुलींचे वेगळे डिपॉझिट द्यावे लागेल)
6) प्रत्येक संघाच्या खेळाडूस एकाच वजनगटात खेळता येईल. प्रत्येक वजनगटातील विजेते खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र 'बी' संघामध्ये स्थान मिळवून राज्याचे प्रतिनिधित्व करतील. ज्या वजनगटामध्ये मुंबई संघाचा खेळाडू प्रथम आला असेल त्या वजनगटाच्या उर्वरित पदक विजेत्यांमधून स्पर्धा घेऊन / परिस्थितीनुरूप निर्णय घेऊन खेळाडूची निवड केली जाईल.
7) एंट्री फॉर्म: सर्व जिल्ह्यांनी आपल्या जिल्ह्याची एंट्री ऑनलाईन पद्धतीने भरायची आहे. आपण गेल्या दोन वर्षांपासून याच पद्धतीने एंट्री फॉर्म भरत असल्याने आणि हा एंट्री फॉर्म कसा भरायचा हे मागील प्रत्येक परिपत्रकामध्ये विस्तृतपणे विशद केले असल्याने यावेळी या परिपत्रकामध्ये ते वर्णन दिले गेलेले नाही. **महत्वाची गोष्ट कृपया लक्षात ठेवावी की, खेळाडूचे ओळखपत्र, लॉटस आणि प्रमाणपत्र आपण पाठवलेल्या एंट्री फॉर्म वरूनच तयार केले जात असल्याने खेळाडूच्या नावातील स्पेलिंगची चूक एंट्री फॉर्म मध्ये करू नये.** जिल्हा संघटनेच्या लेटरहेड्वरील एंट्रीच्या हार्डकॉपीवर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष अथवा सचिव यांची स्वाक्षरी आवश्यक आहे. अशी लेटरहेड्वरील हार्डकॉपी अधिकृत संघ

व्यवस्थापकाबरोबर स्पर्धास्थळी द्यावी. एंट्रीसह प्रत्येक खेळाडूचे जन्मतारखेची मूळ कागदपत्रे / दाखले आणि त्याच्या छायाप्रती एका पासपोर्ट फोटोसह जमा करावा. मूळ कागदपत्रे तपासल्यावर छायाप्रती रेकॉर्डसाठी ठेवल्या जातील आणि मूळ कागदपत्रे जिल्हा संघ व्यवस्थापकांकडे लगेचच सुपूर्द केली जातील. त्यामुळे हि कागदपत्रे परत नेण्याची सर्वस्वी जबाबदारी संघ व्यवस्थापकांची आहे. मूळ कागदपत्रे न नेल्यास अथवा गहाळ झाल्यास राज्य संघटना अथवा त्यांचे स्पर्धा पदाधिकारी जबाबदार राहणार नाहीत. आपल्या जिल्ह्याची एंट्री दिनांक 15 फेब्रुवारी 2022 पर्यंत अपलोड करावी. 15/02/2022 रोजी रात्री 11.59 मिनिटांनी एंट्री बंद होतील. खेळाडूची एंट्री ज्या वजनगटात आहे त्याच वजनगटात त्या खेळाडूस खेळावे लागेल.

- सर्व पंचानी दिनांक 17/02/2022 रोजी सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्पर्धास्थळी उपस्थित राहावे.

8) स्पर्धा नियम: स्पर्धा जेएफआयच्या नूतन प्रचलित नियमांप्रमाणे घेण्यात येतील.

- **यासाठी नव्या नियमांची ओळख होण्यासाठी पंच, प्रशिक्षक आणि खेळाडूंसाठी क्लिनिक घेण्यात येईल.**

9) वजन गट: **खेळाडूचे वय वर्ष 2022 मध्ये 15 वर्षे पूर्ण झालेलं असले पाहिजे**; 18 वर्षांखालील खेळाडूंच्या पालकांकडून जिल्हा संघटनांनी हमीपत्र भरून घ्यावे. हि संपूर्णतः जबाबदारी जिल्हा ज्यूदो संघटनेची आहे. हमीपत्राशिवाय कोणत्याही जिल्हा संघटनेने खेळाडूस खेळू देऊ नये. या हमीपत्राचा नमुना या परिपत्रकासोबत दिलेला आहे. आपल्या संघातर्फे खेळणाऱ्या प्रत्येक खेळाडूच्या पालकांनी जिल्हा संघटनेकडे हमीपत्र भरून दिलेले आहे असे महाराष्ट्र ज्यूदो संघटना समजेल.

| 15 वर्षांवरील पुरुष खेळाडू वजन गट (एकूण 7) | 15 वर्षांवरील महिला खेळाडू वजन गट (एकूण 7) |
|---|---|
| 60 किलोखाली | 48 किलोखाली |
| 66 किलोखाली | 52 किलोखाली |
| 73 किलोखाली | 57 किलोखाली |
| 81 किलोखाली | 63 किलोखाली |
| 90 किलोखाली | 70 किलोखाली |
| 100 किलोखाली | 78 किलोखाली |
| 100 किलोवर | 78 किलोवर |

जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात जेएफआयच्या नियमाप्रमाणे खालील तीन मूळ अधिकृत प्रतींमध्ये वयाचा दाखला आणणे गरजेचे आहे. या शिवाय खेळाडू खेळू शकणार नाही.

अ) महानगरपालिका / पंचायत समिती अथवा समरूप शासकीय व्यक्तीद्वारा जारी वयाचा दाखला / विभागातील सक्षम मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या लेटरहेडवर सही शिक्यानिशी जारी केलेला दाखला.

ब) मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी लेटरहेडवर सही शिक्यानिशी जारी केलेले प्रमाणपत्र यामध्ये जन्मतारीख, वडिलांचे नाव, विद्यार्थ्याचा शिकत असलेला वर्ग, पत्ता, टेलिफोन क्रमांक, आणि शाळेचा दूरध्वनी क्रमांक लिहिलेला असायला हवा. हि माहिती विद्यार्थ्याच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोवर रबरी शिक्का आणि मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसहित साक्षांकित (अटेस्टेड) केलेले हवे.

क) भारत सरकारतर्फे जारी केलेल्या आधार कार्डाची मूळ प्रत.

हे तीनही दाखले अनिवार्य असून याशिवाय खेळाडूस खेळू दिले जाणार नाही. (दाखल्याच्या प्रमाणासाठी जेएफआयचे मूळ इंग्रजी परिपत्रक ग्राह्य धरण्यात येईल.)

10) राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये अँटी डोपिंग चाचणी नियमितपणे केली जात असल्याने आपला खेळाडू अशा गैर गोष्टी करत नाही यावर आपण लक्ष ठेवावे.

11) राज्य संघात निवड झालेल्या खेळाडूनी पूर्वकल्पनेशिवाय आणि अपुऱ्या कालावधीत जर राष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यास असमर्थता दाखवली तर अशा खेळाडूवर महाराष्ट्र ज्युदो संघटनेतर्फे निलंबन आणि आर्थिक दंड अशी कारवाई होते. त्यामुळे राज्य संघात निवड झालेल्या खेळाडूनी आपला राष्ट्रीय स्पर्धेतील सहभाग बंधनकारक असल्याने तो निश्चित करावा.

12) स्पर्धास्थळी, निवास-भोजन स्थळी कोणाचेही गैरवर्तन कदापिही सहन केले जाणार नाही. अशी अप्रिय घटना घडल्यास खेळाडूंसह संबंधित जिल्ह्यावरही कार्यवाही होते.

मॅटवर येऊन वॉकी ओव्हर देणाऱ्या खेळाडूस / संघास दरवेळी रु 100/- दंड आकारला जाईल.

13) संघातील खेळाडूंच्या विम्याची जबाबदारी (इन्शुरन्स) संबंधित जिल्ह्याची असेल.

14) सभासद नसणाऱ्या जिल्हा संघास स्पर्धेमध्ये सहभाग देण्या-न देण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्युदो संघटनेकडे सुरक्षित आहे.


15) प्रत्येक खेळाडू त्या जिल्ह्याचा रहिवासी असायला हवा. स्वत:चा जिल्हा सोडून खेळाडू जर इतर जिल्ह्याकडून खेळताना निदर्शनास आल्यास त्यावर कारवाई होईल. तसेच काळजी न घेता अशा खेळाडूस सहभागी करून घेतल्याबद्दल संबंधित क्लब / जिल्ह्यावरही कारवाई होईल.

16) या स्पर्धेपासून महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनच्या कार्यकारिणीने "महाराष्ट्र पोलीस संघास" सिनियर्स स्पर्धेमध्ये त्यांच्या स्वतंत्र संघ म्हणून खेळण्याची अनुमती दिलेली आहे. सबब, सर्व पोलीस खेळाडूंनी त्यांच्याच पोलीस संघातून निवड चाचणीत सहभाग घेणे आणि पोलीस संघातूनच खेळणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे आपल्या जिल्ह्यातून जर कोणी पोलीस दलात कार्यरत खेळाडू निवडला गेला असेल तर त्याची प्रवेशिका रद्द करून त्याजागी सामान्य खेळाडूचे नाव (नियमाप्रमाणे) पाठवावे. अर्थात **"पोलीस संघातील प्रत्येक ज्युदो खेळाडू हा फक्त आणि फक्त पोलीस दलाच्या निवड चाचणीद्वारे सहभागी होऊन पोलीस संघाद्वारेच येईल."** {येथे पोलीस दल म्हणजे SRPF - राज्य राखीव पोलीस बल आणि तत्सम राज्य शासकीय सुरक्षा बले समजले आहे.}

17) व्यवस्थापक / प्रशिक्षक नसणाऱ्या जिह्यास निवास व्यवस्था करून दिली जाणार नाही.

18) रेफरीचा निर्णय अंतिम असेल. रेफरी -निर्णयाबाबत कक्षेत फक्त संघ व्यवस्थापक / प्रशिक्षक यांनाच मॅट चेअरमन / स्पर्धा संचालक यांच्याकडे नोंदवता येईल. अधिक माहितीसाठी शैलेश टिळक (महासचिव) 94220-29656; रवी पाटील (चेअरमन, टेक्निकल कमिटी) 93242- 55568 अथवा दत्ता आफळे (सचिव टेक्निकल कमिटी) 94231-50231 यांच्याशी संपर्क साधावा. कळावे, शुभेच्छांसह,

आपला विश्वासू,



शैलेश टिळक , महासचिव